


# दलबल दलबल धोताला

अनघा हिरे

# दलबल दलबल धोत्ताला

अनघा हिरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# दलबल दलबल धोत्ताला (बालगीते)


## कवयित्री : अनघा हिरे

Phone no. ९४२२२८४११६

Email: anagha.hiray@gmail.com

७०५, साईद्वारका रेसिडेन्सी,

बनकर मळा ,काठे गल्ली ,

द्वारका , नासिक –४२२००९

ब्लॉग http://anaghah.blogspot.in



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवयोत्रीची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १४ नोव्हेंबर (बालदिन)



©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे - आवश्यकआहे.

अर्पणपत्रिका

पुस्तक वाचून दाखवता दाखवता ज्यांच्यामुळे
लिखाणाची प्रेरणा निर्माण झाली
त्या माझ्या लाडक्या चिमण्या आदिती आणि ओवीस

अनघा हिरे

# अनुक्रम


- एक फुल
- उंदराची आजी
- इटुकली पिटुकली
- वाघोबा
- चिमणी
- भेळ
- गोल गोल फुगा
- पाखरू
- चिऊताई
- लबाड मांजर
- दलबल धोताला
- कुंपण
- बोका
- बाळ
- जेवण
- चिडकी चिऊ
- कावळोबा
- घसरगुंडी
- डौलदार हत्ती
- माझा कन्हैया

- एक फुल



एक फुल
खूप फुलले
वारा बघून
खूप लाजले

वाऱ्या सोबत
उडत गेले
झाडा सोडून
निघून गेले

ढगावर बसून
आभाळ गाठले
दूर झाले
सगेसोयरे

तसेच ढगावर
झाले  स्वार
चंद्र गाठला
त्याने पार

खाली परत जावे
झाडा भेट द्यावे
विचार मनी आला
वारा पसार झाला

झाडाच्या आठवणीत
व्याकुळ झाले
दु:खी मन
रडू लागले .

## • उंदराची आजी

पिंजऱ्यात ठेवली
खमंग भजी
त्यात सापडली
उंदराची आजी

रोज आपली
खुड खुड काय ?
आज मात्र झाली
गरीब गाय

पिंजऱ्यात सुरु झाली
धावपळ फार
सुटकेसाठी बघू
आहे का एखादे दार

मांजरा बघून
घाबरली आजी
खाऊन घेतली
उरलेली भजी



## • इटुकली पिटुकली

इटुकली पिटुकली
पिलू छोटूकली
इवलेसे डोळे छोटे नाक
सगळ्यांना मात्र दाखवते धाक

घरभर फिरते
घेऊन पर्स
सगळ्यांना सांगते
आज झाले नर्स

इंजेक्शन म्हणून
टिचूक करते
खोटा खोटा आ
करायला लावते



ओढणीची मग
साडी होते
शाळेतल्या बाई होऊन
धडे घेते

एक दोन बरोबर
रंगही शिकवतात
अभ्यास नाही केला तर
शिक्षा ही देतात

सगळं खेळून
दमून जाते
आईच्या कुशीत
झोपी जाते



- वाघोबा

डरकाळी मारून
दमलाय जाम
झोपलाय कसा हा
चिमुकला वाघ

शाळेत जातो
चिमुकला वाघ
अभ्यास करून
दमलाय जाम



पुस्तकात आहे
शिकारीचे धडे
आणि छान
कविता अन पाढे

चिमुकला वाघ
वाचतो धडे
आणि तोंडपाठ
म्हणतो पाढे

पुस्तक  वाचून
दमलाय  जाम
झोपलाय कसा हा
चिमुकला वाघ



## • चिमणी



पिटुकली चिमणी
उडत आली
काड्या गवत
घेऊन आली

त्याचा केला
एकच खोपा
खोप्यात ठेवला
कापूस थोडा

पिटुकली चिमणी
उडत आली
फांद्या वेलीवर
डुलत राहिली

झोके घेऊन
गाते गाणी
किलबिल गाणी
वेलीच्या पानी

पिटुकली चिमणी
उडत आली
सगळ्यांना नाद
लावून गेली

पिटुकली चिमणी
परत आलीच नाही
रागावले असेल का
तिला बाबा आई



## • भेळ

कुरुम कुरुम
शेव आणली
संगे कुरमुरे
कुरकुरीत

एक कांदा
बारीक कापला
टोमॅटो कोथिंबीर
वरून सजला

चटणी टाकली
लाल हिरवी
कडक पुरी
कालवून टाकली

सगळ्यांचे केले
एकच मिश्रण
खाऊन टाकले
मुलांनी पटकन

सगळ्याला लागला
काही वेळ
यालाच म्हणतात
ओली भेळ



- गोल गोल फुगा

गोल गोल फुग्यात
बारा रंग
लाल पिवळा
काळा संग

गोल गोल फुगा
उडतो छान
बघा करून
वरती मान

गोल गोल फुगा
आकाशी उडला
हाती नाही लागला
पळून गेला

गोल गोल फुगा
फुगला टम्म
बोट लागताच
फुटला फट्ट



- पाखरू

एक पाखरू
आभाळात पोहोचले
उडता उडता
थकून गेले

समोर दिसला
ढग मऊ
आता त्यावर
विश्रांती घेऊ



तेवड्यात आला
उडता वारा
ढगाला घेऊन
लांब पळाला

पाखरू बिचारे
हिरमुसले झाले
परत फिरून
घरी आले

## • लबाड मांजर

लबाड मांजर घरात घुसले
दुधा पाहून तोंडा पाणी सुटले
मटा मटा दुध पिऊन घेतले
चाटून पुसून फस्त केले

कोपऱ्यात होता उंदीर मामा
माऊला बघून हळूच पळाला
पळता पळता शेपूट लांब
अडकून बसली बिळाच्या आत

धावली मागे दुध सोडून
पंजा बघे बिळात घालून
छोटा उंदीर मोठा उंदीर
कुठेच गवसेना काळा उंदीर

कानाकोपऱ्यात बसून जाऊ
अंग पटापट चाटत राहू
हिरमुसली होऊन बसली माऊ
आता उंदीर कसा खाऊ



## • चिऊताई

एक चिऊताई उडाली
उड उड उड उड उडाली
आकाशात पोहोचली
चंद्रावर जाऊन थांबली



एक चिऊताई उडाली
चंद्रावर जाऊन थांबली
चांदण्यांशी बोलली
बड बड बड बड बडबडली

एक चिऊताई उडाली
चांदण्यांशी बोलली
चांदण्यांशी खेळली
खेळ खेळ खेळ खेळ खेळली

- दलबल धोताला



दलबल दलबल धोताला
सगलेच लागले तिलवायला
आज एक दंम्मत झाली
आमच्या धलात माउ आली
सगल्याना थांगीतले
सगल्याना बोलावले
पकलुन थेवला ले

दलबल दलबल धोताला
सगलेच लागले तिलवायला
आईने मला खोबल दिल
मी ते माउला दिल
सगल्याना आपले आले हशु
मग मला फुत्ले ललू

दलबल दलबल धोताला
सगलेच लागले तिलवायला
लागवते मी मग तेव्हा
लुसून बसते तोपल्यात जेव्हा
तुनीत लत्त्श देत नाही त्ले
सगलेच नुत्ते चीलवतात त्ले
दलबल दलबल धोताला
सगलेच लागले तिलवायला



## • कुंपण

चिव चिव चिमणी
गाते छान
हळूच करून
तिरकी मान

मिठू मिठू पोपट
बोलतो गोड
खाऊन घेतो
पेरूची फोड

कुकूच कू कोंबड्याची
झाली पहाट
सगळ्यांना जागवायला
गाणे गातो भाट

चिमणी न पोपट
उडताय छान
कोंबड्याची आपली
कुंपणा पर्यंतच धाव



- बोका

घरात आमच्या
होता बोका
घरच्या दुधाला
त्याचा धोका

लांब लांब मिश्या त्याच्या
छोटे छोटे कान
अंधारात चमकती डोळे
गुबगुबीत मान



गोरा गोरा चमकदार
रूप त्याचे मस्त
दिवसभर कोपऱ्यात
बसायचा तो सुस्त

रात्री अंधार होताच
जागा व्हायचा मस्त
दही असो वा लोणी
सगळेच करायचा फस्त

बघता त्याला तो
वाटायचा मठ्ठ
हवे तेवढे उंदीर खाऊन
झाला होता लठ्ठ

- बाळ



गडबड करून दमलाय जाम
पाळण्यात झोपले इटुकले बाळ
चळवळ करणार
टकामका बघणार
इटुकल्या पिटूकल्याची एट पहा
टाळ्या वाजवणार
सायकल करणार
इटुकल्या  पिटूकल्याचे थाट फार
डोक्याचे त्याच्या चमन खुले
तोंडाच बोळक शोभून दिसे
इटुकल्या पिटूकल्याचे दिसणेच छान
डोळ्यात काजळ
हनुवटीवर तीट
पिटूकल्याला शोभे काळा तीळ
गडबड करून दमलाय जाम
पाळण्यात झोपले इटुकले बाळ

- जेवण

गरम गरम भात
वरती तुपाची धार
वरण ओतल त्यावर
आली बहार

सोबत होती कोशिंबीर
आणि लोणच्याचा खार
सगळ्यांचा कसा
भलताच थाट

फू फू करत
गट्टम गट्टम मस्त
ताटातले जेवण
झाले फस्त



## • चिडकीचिऊ

अग अग चिऊताई
चिडतेस का?
खिडकीत जाऊन
बसतेस का ?
मुठभर तांदूळ
देते तुला
पकडून ठेव
चोचीत जरा
हवा का तुला
बुंदीचा लाडू
मुठीत तो
नको ग आवळू
चिडण सोड
खाऊ खा
सगळयांमध्ये
मिसळून रहा





- कावळोबा

कावळ्याने घेतली
आकाशात झेप
बघा त्याची कशी
सगळे ठेवताय ठेप

पोपटाने आणले
पेरू लाल लाल
भरलंय पोट माझ
पार्टी होती काल

चिऊने दिली
मोत्याची माळ
नको मला ती
माझ्या पायात चाळ

कोकिळेने केले सुरु
गायनाचे क्लास
सगळ्यांचा होतोय मला
भलताच त्रास

ये रे कावळोबा
नको भाव खाऊ
आमच्यातून तू असा
नको वेगळा राहू



- घसरगुंडी

मोराच्या पिसात
रंग किती छान
बघायला लांडोर
उंच करी मान

उंटाच्या मानेची
करू घसरगुंडी
चढायला मोठी
हवीय शिडी

उंदराचे पडले
पुढचे दात
चीज खायचे तर
मिळाला भात



घसरगुंडीला लावायला
रंग छान छान
चीजची आता
घालू कमान

घसरगुंडी खेळायला
आलाय कोण
मोर आणि लांडोर
सोबत उंदीर दोन



## • डौलदार   हत्ती

डौलदार   हत्ती त्याची
डौलदार चाल
कुणाला सांगू नका
त्याची अवघडली मान

सोंडेचे वजन त्याला
पेलवतच नाही
पोटाची   हालचाल
सहन होत नाही

जिम मध्ये जाऊन
व्हावे स्लिम स्मार्ट
पहिल्याच दिवशी
त्याने तोडले रेकोर्ड



डायटिंग करायचा
निर्णय  घेतला
ट्रकभर केळातच
जेवायचा थांबला

डायटिंग बियटिंग
पुरे झाले फॅड
उगा काही दिवसातच
मी दिसू लागेल मॅड

म्हणो कुणी  लोद्या
वा करो कुणी चेष्टा
मी माझा बरा
सुखी माझ्या जगात



- माझा कन्हैया

आज माझ्या स्वप्नात
माझा बाळकृष्ण आला
बोबड्या बोबड्या बोलातच
मागितले लोणी खायला

छोटीशी स्वारी, कसा
चुरू चुरू बोलतो
म्हणे खाणे नको शिकाऊ
मला, मी शिस्तीतच खातो




दाऊ भैयाची खोडी काढत,
स्वत बसला रडत
मार म्हणे हवे तितके
मी नाही घाबरत

लटके लटके राग धरत अऩं
डोके खुपत गुडघ्यात
दंग कसा झाला मनु
खोटखोट रडण्यात

शोनू माझा राजा
शहाणा झाला
रोज आता अभ्यास
करेल म्हणाला

अभ्यासात आता
नको श्लोक वाणी
हवी त्याला एबीसीडी
तिही रिदम गाणी



गाई चरायला स्वारी
आता जाणार नाही
बॅटबॉल, बुद्धिबळ
त्याला नवे नाही

गोड गोड बोलत
त्याने फोन केला
खेळायला नवी नवी
खेळणी हवीय त्याला

एक सत्य मात्र त्याने
सांगितले जाता जाता
प्रेमाची तू यशोदामैया पण
जन्मदात्री ती देवकीच माझी माता

नंदाचा लाडला माझा कन्हैया
मला आज चक्क म्हणाला मैया
मला आज चक्क म्हणाला मैया.



# अनघा हिरे



अनघा हिरे सुप्रसिध्द लेखिका आहेत. त्यांनी आजवर अनेक पुस्तके लिहिली व अनुवादित केली आहेत. यात National Book Trust India तर्फे बावीस भाषांतून अनुवादित होऊ घातलेल्या “मधूचे मधप्रेम “ या पुस्तकाचा समावेश आहे . नेपाली बेडकाचे साहसी कारनामे, ड्रगन त्सुनामी (जपानी लोक कथा ) , The letters from the forest school आदी पुस्तकांचे त्यांचे अनुवाद प्रसिद्ध झालेले आहे .

या छापील पुस्तकां सोबतच त्यांनी “ढ ढ ढगुल्या, पक्षांना रंग कसे मिळाले आदी ई पुस्तके लिहिली आहेत . तसेच बालनेटाक्षरी या ई मासिकाचे संपादनही केले आहे .त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या बालविभाग प्रमुख आहेत. त्या शिवाय “माझ्यामना ई प्रकाशनाच्या त्या मुख्य संपादिका आहेत . ज्या गोष्टीत आनंद मिळतो त्या गोष्टीत झोकून देण्याचा त्यांचा स्वभाव हेच त्यांचे विशिष्ट म्हणता येईल.

आपल्याला हे पुस्तक कसे वाटले ते कळवा. तसेच त्यांची इतर पुस्तके मिळवा. Phone no. ९४२२२८४११६

Email: anagha.hiray@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत.  महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!